**कृपया प्रसिद्धीसाठी** **7 जानेवारी 2014**

***दोन दिवसात पेट्रोलची दरवाढ दोनदा***

***सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?: राम नाईक***

**मुंबई, मंगळवार :** ''महागाईच्या दुष्टचक्राला गती देणा-या संवेदनशील पेट्रोल आणि डिझेलचे दर दोन दिवसात दोन वेळा वाढविण्यात आले आहेत. लोकमान्य टिळकांच्या भाषेत बोलायचे झाल्यास काँग्रेस सरकारचे डोके ठिकाणावर आहे का असा प्रश्न निर्माण झाला आहे. 3 जानेवारी रोजी प्रति लिटर पेट्रोलचा दर रु. 1.11 तर डिझेल रु. 0.71 असे वाढविण्यात आले आणि त्यानंतर दोनच दिवसांनी म्हणजे 5 जानेवारी रोजी पेट्रोलचा दर रु. 1.64 आणि डिझेल रु. 1.09 असे वाढविण्यात आले आहेत. ही दरवाढ दोन दिवसात का आणि कशी करण्यात आली याचा खुलासा पेट्रोलियम मंत्री श्री. विरप्पा मोईली यांनी केला पाहिजे'', अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी आज मुंबई येथे पत्रकार परिषदेत केली.

दिल्ली, राजस्थान, मध्यप्रदेश आणि छत्तिसगढ या राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या दारुण पराभवाचे महागाई हे प्रमुख कारण असल्याचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी 3 जानेवारी 2014 रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत मान्य केले होते. तथापि काँग्रेसने या पराभवातून कोणताच धडा घेतला नाही. वाजपेयी सरकारच्या कालावधीत म्हणजे मे 2004 मध्ये जीवनावश्यक वस्तूंच्या मुंबईतील किंमतीसंबंधीचे एक तुलनात्मक पत्रक श्री. राम नाईक यांनी प्रसिद्ध केले असून त्यामध्ये युपीए-1 च्या कार्यकालातील म्हणजेच एप्रिल 2009 आणि युपीए-2 च्या कार्यकालातील म्हणजेच 5 जानेवारी 2014 च्या किंमती आणि किंमतीमध्ये झालेली तुलनात्मक वाढ दिली आहे. पत्रकात दिलेल्या माहितीप्रमाणे पेट्रोल प्रति लिटर 2004 मध्ये रु. 33.15 होते ते आता रु. 81.31 (145% वाढ), डिझेल रु. 22.50 वरुन आता रु. 61.51 (178% वाढ) तर केरोसिन रु. 18 वरुन आता रु. 70 (289%वाढ) झाले आहे. स्वयंपाकाचा एलपीजी सिलेंडर रु. 244 वरुन विना अनुदानीत रु. 1,264.50 (418 % वाढ) इतका झाला आहे. पेट्रोलियम पदार्थांच्या भाव वाढीमुळे महागाईच्या दुष्टचक्राला अधिकच गती मिळते असेही श्री. राम नाईक म्हणाले.

..2..

इथेनॉलसारख्या पर्यायी इंधनाचा वापर न केल्यामुळे, तसेच पेट्रोल, डिझेलच्या अधिक खपामुळे कच्च्या तेलाची आयात वाजपेयींच्या काळात एकूण गरजेच्या 70 % होती ती आता 80 % झाली आहे. भरीस भर म्हणून डॉलर-रुपया यांच्या विनिमयाचा दर  2004 मध्ये रु. 45.10 होता त्याऐवजी आता रु. 62.17 म्हणजेच 38 टक्क्यांनी वाढला आहे. त्यामुळे कच्च्या तेलाच्या आयातीच्या वाढलेल्या किमतीबरोबरच 38 % रक्कम अधिक द्यावी लागत आहे असेही श्री. राम नाईक म्हणाले.

खाद्य पदार्थांपैकी गव्हाचा दर 2004 च्या प्रति किलो रु. 9 वरुन आता रु. 28 (211 % वाढ), तांदूळ रु. 10 वरुन रु. 30 (200 % वाढ), गूळ रु. 14 वरुन रु. 45 (221 % वाढ) झाला आहे.  भाजीपाल्यामध्ये झालेली वाढ या पेक्षाही भयंकर असून कांदा रु. 6 वरुन रु. 30 (400 % वाढ), तर बटाटा रु. 8 वरुन रु. 30 (275 % वाढ) झाला आहे.  दूध रु. 14 लिटर वरुन रु. 56 (300 % वाढ) तर महत्त्वाच्या डाळींपैकी तुरडाळ रु. 30 वरुन रु. 80 (167 % वाढ), मुगडाळ रु. 24 वरुन रु. 108 (350 % वाढ) आणि चण्याची डाळ रु. 25 वरुन रु. 58 (132 % वाढ) झाली आहे.

‘‘आर्थिक प्रगतीचा दर ‘सकल देशांतर्गत उत्पन्न’ (जीडीपी) वरुन मोजला जातो. हा दर 2012-2013 मध्ये 5 % राहील असे भारत सरकारच्या सांख्यिकी संघटनेनेच जाहीर केले असून तो गेल्या 10 वर्षात सर्वांत कमी असून जणू धोक्याची घंटीच वाजवित आहे. याशिवाय किरकोळ महागाईचा दर नोव्हेंबर 2013 मध्ये विक्रमी वेगाने म्हणजे 11.24 टक्क्यांनी वाढला आहे. महागाईच्या विरोधात तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या भ्रष्टाचार विरोधात जनजागृतीचे अभियान भारतीय जनता पार्टीतर्फे स्थानिक पातळीवर चालूच राहील’’ असेही श्री. राम नाईक यांनी सांगितले.

**(कार्यालय सचिव)**

**सोबत : पत्रक.**

**5 जानेवारी 2014**

# भारतीय जनता पार्टी, मुंबई

## *जीवनावश्यक वस्तूंच्या मुंबईतील किंमती*

**(संकलक श्री.राम नाईक, श्री. गिरीधर साळुंके)**

| वस्तू | भाजपा सरकारच्या काळातील दर (प्रति किलो रु.) मे 2004 | पहिल्या काँग्रेस सरकारच्या काळातील दर (प्रति किलो रु.) एप्रिल 2009 | दुसऱ्या काँग्रेस सरकारच्या काळातील दर (प्रति किलो रु.) 5 जानेवारी 2014 | 2004 च्या तुलनेत वाढ (%प्रतिशत) |
|---|---|---|---|---|
| गहू | 9 | 20 | 28 | 211% |
| तांदूळ | 10 | 22 | 30 | 200% |
| साखर | 14 | 23 | 38 | 171% |
| चहा पावडर | 80 | 190 | 300 | 275% |
| खाद्य तेल | 40(प्रति लिटर) | 70(प्रति लिटर) | 88(प्रति लिटर) | 120% |
| डालडा | 40 | 60 | 100 | 150% |
| तूर डाळ | 30 | 100 | 80 | 167% |
| मुग डाळ | 24 | 54 | 108 | 350% |
| मसूर डाळ | 22 | 60 | 78 | 255% |
| चणा डाळ | 25 | 36 | 58 | 132% |
| गूळ | 14 | 32 | 45 | 221% |
| बेसन | 20 | 48 | 64 | 220% |
| बटाटा | 8 | 14 | 30 | 275% |
| कांदा | 6 | 16 | 30 | 400% |
| टोमॅटो | 9 | 16 | 20 | 122% |
| दूध | 14 (प्रति लिटर) | 28(प्रति लिटर) | 56(प्रति लिटर) | 300% |
| केरोसीन | 18 (प्रति लिटर) | 25 (प्रति लिटर) | 70(प्रति लिटर) | 289% |
| स्वयंपाकाचा गॅस | 244 (प्रति सिलेंडर) | 312(प्रति सिलेंडर) | 444.50 (प्रतिसिलेंडर)<br>* 1264.50 (प्रतिसिलेंडर) **विनाअनुदान** | 82%<br>418% |
| पेट्रोल | 33.15 (प्रति लिटर) | 44.60(प्रति लिटर) | 81.31(प्रति लिटर) | 145% |
| डिझेल | 22.50 (प्रति लिटर) | 34.50(प्रति लिटर) | 62.60 (प्रति लिटर) | 178% |
| सीएनजी | 19.71(प्रति किलो) | 24.65(प्रति किलो) | 38.95(प्रति किलो) | 98% |
| डॉलर $1 | रु. 45.10 | रु. 50.05 | रु. 62.17 | 38**%** |

*विशेष :*

1. 2012-2013 चे 'सकल देशांतर्गत उत्पन्न'(जीडीपी) 5 टक्के राहील असे भारत सरकारच्या सांख्यिकी संघटनेने जाहीर केले आहे. हा दर गेल्या 10 वर्षात सर्वात कमी असून जणू धोक्याची घंटीच वाजवित आहे. 31 ऑगस्ट 2013 रोजी एप्रिल-जून 2013 च्या तिमाहीचा दर 4.4 टक्के जाहीर झाला असून तो गेल्या चार वर्षातील नीचांक आहे. तर किरकोळ महागाईचा दर नोव्हेंबर 2013 मध्ये विक्रमी वेगाने म्हणजे 11.24 टक्के वाढला आहे.

2. या शिवाय डॉलर -रुपया विनिमय दर 2004 मध्ये रु. 45.10 होता तो आता रु. 62.17 म्हणजे 38 टक्क्यानी वाढला आहे. याचाच अर्थ आपल्याला आयात करताना 38 टक्के किंमत जास्त द्यावी लागत आहे. सध्या आपली आयात निर्यातीपेक्षा जास्त होत असल्याने रुपयाच्या अवमूल्यनाचा जोरदार फटका भारतीय अर्थव्यवस्थेला बसत आहे.

3. कच्च्या तेलाची (क्रूड ऑइल) आयात 70 टक्क्यावरुन 80 टक्क्यावर गेली आहे तसेच अंतरराष्ट्रीय बाजारातील तेलाची किंमत खूपच वाढली आहे. त्यामुळे सर्वांगिण किंमत वाढीच्या दुष्टचक्राची गती फारच वाढली आहे. डिसेंबर 2013 मध्ये चार राज्यातील विधान सभा निवडणुकामध्ये झालेला काँग्रेसचा दारुण पराभव मुख्यतः महागाईमुळे झाला हे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी 3 जानेवारी 2014 रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये मान्य केले आहे. पत्रकार परिषदेच्या दिवशीच पेट्रोल आणि डिझेलचे दर प्रति लिटर अनुक्रमे रु. 1.11 आणि रु. 0.71 वाढविण्यात आले तर पुन्हा दोनच दिवसात अनुक्रमे रु. 1.64 आणि रु. 1.09 असे वाढविण्यात आले. सरकारचे डोके ठिकाणावर नसल्याचाच हा पुरावा आहे.